कायम विना अनुदान तत्वावर

पुणे जिल्हा परिषद,पुणे
"शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भवन "
जा. क्र. जिप/शिक्षण /प्राथ/२/२१/०३/ २००४
पुणे. दिनांक :- ६/३/२००४

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

ऑक्झिलियम कॉन्व्हेंट
प्रायमरी स्कूल रायवुड
पार्क, लोणावळा ता. मावळ

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील " शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम-इंग्रजी)

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२/)/प्राशि-३
दिनांक :- १४ जानेवारी २००३

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम / जादा तुकडया / वर्ग जून - २००३ पासून सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा / नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | ऑक्झिलियम कॉन्व्हेंट प्रायमरी स्कूल रायवुड पार्क लोणावळा. ता- मावळ | इंग्रजी | इ १ ली<br>इ-२ ते ४थी | २री तुकडी अतिरिक्त<br>प्रथम वर्ग नैसर्गिक वाढीने व प्रत्येकी १ ली तुकडी अतिरिक्त | मंजूर |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे.
३. सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विदयार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद करणेत येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष
दि लोणावळा सोसायटी ऑफ
सॅलेशियन सिस्टर्स, लोणावळा